# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५

ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

जा.क्र.झोपुप्रा/तह-ताबा/३१६/२०१८

दि. १५/०६/२०१८

कार्यालयीन परिपत्रक क्र. १०/२०१८

विषय :- झोपुप्राच्या ताब्यात असणा-या सदनिका संक्रमण शिबिराकरिता भाडेतत्त्वावर विकसक यांना देत असताना गृहरचना संस्थेस द्यावयाच्या शुल्काबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ताब्यामध्ये एकुण १६ योजना क्षेत्रातील २१२० निवासी सदनिका, २० बिगर निवासी दुकान गाळे ताब्यात आहे. विकसकाच्या विनंती अन्वये सदर सदनिका तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्त्वावर संक्रमण शिबिराकरिता पुनर्वसन योजनेमधील पात्र झोपडीधारकांना दिल्या जातात.

उक्त योजना क्षेत्रातील काही योजना क्षेत्रामध्ये कायमस्वरुपी पुनर्वसन केलेल्या पात्र झोपडीधारकांची सहकारी गृहरचना संस्था ही स्थापन झालेली आहे. अभिहस्तांतरण करारनामाव्दारे इमारततील सर्व हक्क व अधिकार सदर गृहरचना संस्थेस दिले जातात. इमारतीमधील ज्या सदनिका भाडेतत्त्वावर कार्यालयामार्फत दिलेल्या आहेत, त्या सदनिकाच्या देखभालीबाबत, सार्वजनिक पॅसेज, पार्किंग, सार्वजनिक जिना, लिफ्ट यांची स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होत नसलेबाबत संबंधित गृहरचना संस्थेतील सभासद वारंवार या कार्यालयास तक्रार करित आहेत. भाडे करारनामेनुसार सदर बाबींची पुर्तता विकसकामार्फत करणे बंधनकारक असले तरी त्याची अंमलबजावणी होत नसलेचे दिसून आले आहे.

सबब ज्या इमारतीमध्ये कायमस्वरुपी पुनर्वसन झालेले सदनिकाधारक व संक्रमण शिबिरातील सदनिकाधारक आहेत, अशा खालील योजना क्षेत्रामध्ये विकसक यांनी प्रतिमाह भाडे तत्त्वावर घेतलेले प्रतिसदनिका ७० रुपये तर संक्रमण शिबिरामध्ये राहणाऱ्या पात्र झोपडीधारकांनी प्रतिमाह प्रतिसदनिका ३० रुपये असे एकुण १०० रुपये प्रति सदनिका याप्रमाणे संबंधित सहकारी गृहरचनेस स्वच्छता, देखभाल व सुरक्षितता याकरिता जमा करणे हे बंधनकारक राहिल.

| अ.क्र | संक्रमण शिबिराचे नाव | सहकारी गृहरचना संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | सर्व्हे नं. १००४, सदाशिव पेठ, राजेंद्रनगर, पुणे | महात्मा फुले सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे (सी,इ,जी इमारती करिता मर्यादित) |
| २ | फा.प्लॉ.क्र. २८/१, सि.स.नं. १७१७, १७१९ ते १७२२, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे | अनुतेज अथर्व झोपडपट्टी पुनर्वसन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, शिवाजीनगर, पुणे |

| | | |
|---|---|---|
| ३ | स.नं. ३१४अ/४ (पार्ट) कोकणे वस्ती, हडपसर, पुणे | कोहिनूर हाईटस् सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, हडपसर, पुणे |
| ४ | स.नं. १६५ बी, माळवाडी, हडपसर, पुणे | राजर्षी शाहू को.ऑप.हौ. सोसायटी, हडपसर, पुणे |
| ५ | स.नं. ७८६ व ७८७, मंजुळाबाई चाळ, भवानी पेठ, पुणे | सिध्दार्थ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, भवानी पेठ, पुणे (DA व DB विंग करिता मर्यादित) |
| ६ | स.नं. ३८, हि.क्र. ४ए/१/१, प्लॉ.नं. ४८६ड पर्वती, पुणे | कुमार सुरभी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पर्वती, पुणे (देखभाल शुल्क रक्कम हस्तांतरित करणे वर ) |
| ७ | स.नं. ४२३, फा.प्लॉ.नं. २८ मंगळवार पेठ, पुणे | रियाज कुरेशी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, मंगळवार पेठ, पुणे |
| ८ | स.नं. २९१ ते २९४ आरु चाळ, एरंडवणा, पुणे | मयुरेश विहार को.ऑप.हौ.सोसायटी, एरंडवणा,पुणे (देखभाल शुल्क रक्कम हस्तांतरित करणे वर ) |

सदर आदेशाची अंमलबजावणी १ जुलै २०१८ पासून करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

प्रत :- १) सचिव, झोपुप्रा, पुणे
२) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा १,२,३
३) सहाय्यक संचालक, नगररचना झोपुप्रा, पुणे
४) उपअभियंता, झोपुप्रा, पुणे
५) तहसिलदार ताबा, झोपुप्रा, पुणे
६) लेखाधिकारी, झोपुप्रा, पुणे
७) सहाय्यक निबंधक, झोपुप्रा, पुणे
८) ---------------------------- सहकारी गृहरचना संस्था ---------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
९) विकसक ---------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------

पुढील कार्यवाहीस्तव.